# प्रेसनोट

दि.२९/०१/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणी पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| क्लम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | अशोक श्रीपती गायकवाड, वय–५२ वर्ष, वजन मापे निरीक्षक, वर्ग–२, नेमणुक वजन मापे कार्यालय, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १२,०००/– रुपये तडजोडीअंती १०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे मा.राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतूक संस्था, प्रवरानगरचे मॅनेजर असून सदर संस्थेच्या वतीने भारत पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोल पंप चालविला जात आहे. सदर पेट्रोल पंपाची वार्षिक तपासणी करुन स्टॅम्पिंग प्रमाणपत्र देण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक अशोक श्रीपती गायकवाड, वजन मापे निरीक्षक, वर्ग–२, नेमणुक वजन मापे कार्यालय, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर हे १२,०००/– रुपये लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयाकडे आज दि.२९/१/२०२४ रोजी प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आज दि.२९/१/२०२४ रोजी प्रवरानगर येथील संस्थेच्या वतीने चालविल्या जाणा–या पेट्रोल पंप येथे लाच मागणी पडताळणी केली असता यातील आरोपी लोकसेवक गायकवाड यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष १२,०००/– रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती १०,०००/– रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानुसार आज दि.२९/१/२०२४ रोजी प्रवरानगर येथील सदर संस्थेच्या पंपावर लोकसेवक गायकवाड यांचेविरुध्द सापळा लावण्यात आला असता सदर सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक गायकवाड यांनी यातील तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष १०,०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत लोणी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर